# सामान्य प्रशासन विभाग,
# नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

दुरध्वनी - ०२५३-२५९१०१० / फॅक्स- ०२५३-२५०८३८९ / ईमेल- gadzpnsk@gmail.com


---

नाशिक जिल्हा परिषद,नाशिक
जा.क्र.साप्रवि/आस्था-६/ २७७ /२०१७
नाशिक दिनांक :- १७/०५ /२०१७

प्रति,
खाते प्रमुख (सर्व)
जिल्हा परिषद, नाशिक.

**विषय:- तालुका संपर्क अधिकारी म्हणून नेमून दिलेल्या तालुक्यास नियमित भेटी देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासनाकडून काही महत्वाच्या योजना धवजांकित योजना म्हणून राबविण्यात येत आहेत. यात प्रामुख्याने स्वच्छ भारत अभियान-ग्रामिण,जलयुक्त शिवार अभियान, विविध घरकुल योजना (इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना,शबरी घरकुल योजना, रमाई आवास योजना इ.) म.गां.रा.ग्रा.रो.ह.योजना , सिंचन विहिरी इत्यादी चा समावेश आहे.

वरील योजनांची कामे त्या-त्या कार्यक्षेत्रात सुरु असून या कामांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीबाबत मा.मुख्यमंत्री महोदय, मा.मंत्री महोदय, मा.प्रधान सचिव/सचिव, मा.विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी हे वारंवार आढावा घेत असतात यामुळे ही उदिष्टे तात्काळ पूर्ण होणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने प्रत्येक खातेप्रमुखास तालुका संपर्क अधिकारी म्हणून तालुक्याची जबाबदारी देण्यात आली आहे. **(समवेत तालुका संपर्क तपशिल)** तथापि, तालुका संपर्क अधिकारी म्हणून या संदर्भात आपणाकडून कुठलीही कार्यवाही/पाठपुरावा ,आढावा घेतला जात नाही तसेच अहवाल सादर केला जात नाही ही बाब निश्चितच समाधारणकारक नाही.

तरी यापुढे दर आठवडयास (सोमवार वगळून) आपण आपणास नेमून दिलेल्या तालुक्यास भेट देवून गट विकास अधिकारी (उ.श्रे) /सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेशी चर्चा करुन वरील कामांचा आढावा घ्यावा व कामांच्या प्रगतीबाबतचा अहवाल मला समक्ष अवगत करावा यापुढे दर सोमवारी होणा-या बैठकीत याबाबत आढावा घेण्यात येईल यांची नोंद खाते प्रमुख (सर्व) यांनी घेण्यात यावी.

उपरोक्त कामांच्या प्रगतीबाबत अद्यावत अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावयाचा असतो अथवा व्हिडोओ कॉन्फरन्स द्वारे सुध्दा आढावा होत असल्याने खाते प्रमुख,गट विकास अधिकारी (उ.श्रे), पंचायत समिती (सर्व) यांची आढावा बैठक घेवून ही कामे प्राधान्याने पुर्ण करण्याचे निर्देशही देण्यात यावेत.

तरी आपण तात्काळ आपल्या अधिनस्त तालुक्यास भेट देवून वरील कामांचा आढावा घेवून आपला अहवाल तात्काळ साप्रवि/आस्थापना-६ संकलनाकडे सादर करावा व यापुढे दर आठवडयास आपल्या संपर्क तालुक्यास भेटी देवून अहवाल सादर करावा असे निर्देश या पत्रान्वये आपणास देण्यात येत आहे.

Deepak
17/05/17

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
१.मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
२.मा.जिल्हाधिकारी,नाशिक.

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी**
१.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक.
२.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि),जिल्हा परिषद, नाशिक.
३.गट विकास अधिकारी (उ.श्रे),पंचायत समिती,(सर्व)
३.साप्रवि/आस्थापना-६, जि.प.नाशिक [illegible]

खालील प्रमाणे संपर्क अधिकारी यांना नेमणूक दिलेले तालुके
या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-६/२४९/२०१५ दिनांक-०८.०५.२०१५ अन्वये

| अ.क्र | अधिका-यांचे नांव | पदनाम | संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक दिलेला तालुका |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. प्रदिप चौधरी | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | निफाड |
| २ | श्री. राजेंद्र पाटील | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रांप) | नाशिक |
| ३ | श्रीमती. प्रतिभा संगमनेरे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व) | चांदवड |
| ४ | श्री. बोधीकिरण सोनकांबळे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | इगतपुरी |
| ५ | श्री. सिध्दार्थ तांबे | कार्यकारी अभियंता इवद क्र.१ | दिंडोरी |
| ६ | श्री. मिलींद कांबळे | कार्यकारी अभियंता इवद क्र.२ | सुरगाणा |
| ७ | श्री. रविंद्र परदेशी | कार्यकारी अभियंता इवद क्र. ३ | येवला |
| ८ | श्री. बापू देसले | कार्यकारी अभियंता ल.पा (पूर्व) | मालेगांव |
| ९ | श्री. चंद्रकांत वाघमारे | कार्यकारी अभियंता ल.पा (पश्चिम) | कळवण |
| १० | श्री. प्रकाश नंदनवरे | कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पुरवठा | सिन्नर |
| ११ | श्री. हेमंत काळे | कृषि विकास अधिकारी | पेठ |
| १२ | डॉ.श्री. प्रशांत फालक | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | बागलाण |
| १३ | डॉ.श्री. सुनिल वाकचौरे | जिल्हा आरोग्य अधिकारी | त्र्यंबकेश्वर |
| १४ | श्री. प्रविण अहिरे | शिक्षणाधिकारी (प्राथ) | नांदगांव |
| १५ | श्री. देविदास नांदगांवकर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | देवळा |

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक करिता**